(83)

592

नेमणूक मान्यता आदेश

जा.क्र. जिपजा/शिक्षण/प्रा-६/९५-
कार्यालय जिल्हा परिषद, जालना.
दिनांक :- 17/3/97

प्रति,
मुख्याध्यापक,

पार्थ प्राथमिक शाळा,
अंकुश नगर

विषय :- कर्मचारी नेमणूकीस मान्यता देण्या बाबत.
संदर्भ :- आपला प्रस्ताव क्र. 2-12-96

आपल्या उपरोक्त संदर्भीय प्रस्तावास अनुसरून शाळेच्या आवश्यकते प्रमाणे संस्थेने नेमलेल्या कर्मचा-यांना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमाच्या व खाली दर्शविलेल्या अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

१] आपल्या शाळेतील सर्व वर्ग तुकडया मान्यता व अनुदान प्राप्त असून त्यासाठी आवश्यक कर्मचा-यांच्या संख्येस शिक्षणाधिकारी [प्राथमिक] यांनी मान्यता दिलेली आहे. त्या पेक्षा जादा नेमलेल्या कर्मचा-यांच्या वेतनाची जबाबदारी शाळेवर/संस्थेवर राहील.

२] कर्मचारी अनुसूचि मंजूरी आदेशात विहित केलेले प्रशिक्षित प्रमाण राखण्यात आलेले आहे.

३] शाळेतील शिक्षक कर्मचारी व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी विहित धडयाळी केलेल्या तासिका प्रमाणे पूर्णवेळ सेवा करीत आहेत.

४] महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती नियम १९८१ च्या नियम क्र.७ अन्वये आवश्यक ते मागासवर्गीयांचे प्रमाण राखलेले असून मागासवर्गीय कर्मचारीच्या नेमणूका करण्या बाबतची कार्यवाही नियम क्र.८ व ९ अन्वये पूर्ण करण्यांत आलेली आहे.

५] व्यवस्थापनाने केलेल्या नेमणूका या महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी [सेवेच्या शर्ती नियम १९८१ च्या अनुसूचि "ब" मध्ये दिलेल्या शैक्षणिक अर्हता व अनुसूचि ["क" मध्ये दिलेल्या वेतन श्रेणी नुसारच उपलब्ध पदांच्या अधिन राहून करण्यांत आलेल्या आहेत.

६] या कार्यालयाकडून अतिरिक्त शिक्षक आपणाकडे समावून घेण्यासाठी पाठविल्यास व त्या नुसार ते अतिरिक्त म्हणून नेमले गेल्यास नेमणूक दिलेल्या शिक्षकास २४ तासा ची नोटीस देवून कमी करण्यांत येईल. अशी लेखी समज त्यांना देण्यात यावी व समज मिळाल्या बद्दलची त्यांची स्वाक्षरी आपल्या दप्तरी ठेवावी.

७] १९९ - ९ वर्षात जादा मिळालेल्या तुकड्यांसाठी नेमलेल्या कर्मचा-यांना मान्यता मिळालेली असली तरी जिल्हा नियोजन व विकास मंडळाने आर्थिक तरतूद उपलब्ध करून दिल्यासच वेतन अदा केले जाईल सदरील जादा तुकडयां अनुदान तत्वावर आल्याचे आदेश मिळाल्यानंतरच कर्मचा-यांची देयके सादर करावीत.

[ कृपया पान नंबर २ वर पहा]

B/ 17/3/97